Chaitrali.chandorkar@timesgroup.com
म. टा. प्रतिनिधी, दिल्ली

हवामान बदलांचे दुष्परिणाम रोखण्यासाठी भारताने पॅरिस करार मान्य करून स्वागतार्ह पाऊल उचलले आहे. मात्र यापुढे देशाच्या प्रगतीचे स्वप्न पूर्ण करताना निसर्गाची हानी होणार नाही, अशी दुहेरी भूमिका स्वीकारावी लागेल. करारात लिहिलेल्या वचनांची अंमलबजावणी करण्यासाठी आक्रमक झाले पाहिजे, असे मत राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी गुरूवारी व्यक्त केले.

द एनर्जी अँड रिसोर्स इन्स्टिट्यूट (टेरी)तर्फे दिल्लीमध्ये आय़ोजित करण्यात आलेल्या जागतिक शाश्वत विकास परिषदचे उद्घाटन मुखर्जी यांच्या विज्ञान भवन येथे हस्ते झाले. या वेळी टेरीचे अध्यक्ष अशोक चावला, महासंचालक डॉ. अजय माथूर, संचालिका अन्नपूर्णा वाँचेश्वरण उपस्थित होत्या. पर्यावरण संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सिक्किमचे मुख्यमंत्री पवन कुमार चांमलिंग यांना या वेळी मुखर्जी यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

भारतामध्ये जगातील १८ टक्के लोकसंख्या वास्तव्यास आहेत. यातुलनेत केवळ ४ टक्के सौरऊर्जेतून उपलब्ध होणारे जलस्रोत आपल्याकडे उपलब्ध आहेत. जगातील उर्जा वापरामध्ये आपला वाटा सहा टक्के आहे. आगामी काळात कार्बन वायू उत्सर्जन रोखण्यासाठी आपल्याला व्यापक पातळीवर अपारंपरिक उर्जा आणि सौर उर्जेच्या वापरावर भर द्यावा लागणार आहे, असे मुखर्जी यांनी सांगितले.

पॅरिस करारावर सही करून आपण पर्यावरणबद्दल संवेदनशील आहोत हे जगाला दाखवून दिले आहे.  पुढची वाट खडतर आहे. विकास आणि पर्यावणाचा मेळ साधण्याची कसरत आपल्याला करावी लागणार आहे. यासाठी धोरणाची आखणी नव्हे तर काटकोर अंमलबजावणी आवश्यक आहे. देशातील नागरिकांच्या प्राथमिक गरजा पुरविण्याबरोबरच शाश्वत विकासाची कास धरली पाहिजे, असे मुखर्जी यांनी सांगितले.

दरम्यान, केंद्रीय वने आणि पर्यावरण मंत्री अनिल दवे यांनीही परिषदेतील एका कार्यशाळेत कराराचे वास्तव उपस्थितांसमोर मांडले. पॅरिस करारात भारताने स्वतःवर लादून घेतलेली बंधने केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष कामातून उतरली पाहिजे, अन्यथा इतर अनेक करारांप्रमाणेच या कराराचेही महत्त्व राहणार नाही.

अपारंपरिक उर्जा उत्पादनांच्या जोरावर भारत शाश्वत विकासाचे स्वप्न नक्कीच पूर्ण करेल, असा विश्वास केंद्रीय उर्जा मंत्री पियूष गोयल यांनी व्यक्त केला. आर्थिक विकास आणि शाश्वत प्रगती कधीच एकत्र होऊ शकत नाहीत, या निकषावर माझा विश्वास नाही. शाश्वतता कोणत्याही एका क्षेत्रापूरती मर्यादित जबाबदारी नाही. उद्योजकांनी शाश्वत विकासाकडे सक्ती म्हणून नव्हे तर स्वच्छेने हे बदल आत्मसात करण्याची गरज आहे. काही मोजके लोक आपल्या स्वातंत्र्यावर गदा आणत आहे, हा पूर्वग्रह दूषित बाजूला सारून सर्वांनी कायदेशीर बंधनांशिवाय या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन गोयल यांनी केले.

.................